# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB, Racold, legrand, HAVELLS, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २८९ वा शुक्रवार दि.२६ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहूलजी गांधी लातूरात, काँग्रेस पक्ष पदाधिकाऱ्यांनी केले उत्स्फुर्त स्वागत

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहूलजी गांधी लातूर मुक्कामी, काँग्रेस पक्ष पदाधिकाऱ्यांनी केले उत्स्फुर्त स्वागत लातुर प्रतिनिधी : दि. २४ एप्रिल २०२४ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहूलजी गांधी गुरूवार दि. २४ एप्रिल २४ रोजी लातूर मुक्कामी थांबले आहेत. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार धीरज विलासराव देशमुख तसेच लातूर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डाँ. काळगे शिवाजी बंडाप्पा तसेच जिल्हयातील माजी आमदार काँग्रेस पक्ष पदाधिकारी यांनी त्यांचे लातूर विमानतळावर स्वागत केले. काँग्रेस पक्षाचे नेते राहूल गांधी, विधानसभेतील काँग्रेसचे गटनेते माजी मंत्री बाळासाहेबजी थोरात, प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांचे आज दुपारी सोलापूरला जाण्यासाठी अमरावती येथून



विमानाने लातूर विमानतळावर आगमणे झाले. याठिकाणी आमदार धिरज देशमुख, लातूर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डाँ. काळगे शिवाजी बंडाप्पा, माजी आमदार त्रिबंक नाना भिसे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष कीरण जाधव यांच्यासह मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले. लातूर येथून काँग्रेस नेते राहूलजी गांधी हॅलीकॉप्टरने सोलापूर येथील सभेला रवाना झाले. सोलापूर येथील सभा आटोपून काँग्रेस नेते राहूल गांधी पून्हा लातूर विमानतळावर आगमण झाले. यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख व मान्यवर नेत्यांनी त्यांचे स्वागत केले, व त्यांना लातूर येथील ग्रॅड हॉटेल येथे घेऊन आले. या भेटीत काँग्रेस नेते राहूल गांधी व माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्यामध्ये महाराष्ट्रातील एकूण सदयाची राजकीय परिस्थिती, निवडणूक प्रचार यंत्रणा, काँग्रेस व महाविकास आघाडीला मिळत असलेला प्रतिसाद यावर चर्चा केली. लातूर येथील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांची प्रचार यंत्रणा या संदर्भाने माहीती घेऊन डॉ. शिवाजी काळगे यांना राहूल गांधी यांनी विजयी होण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी ङ. समद पटेल, व्हा. चेअरमन रवी काळे, मोईज शेख, ङ दिपक सुळ, विक्रात गोजमगुंडे, संतोष देशमुख, अमर खानापूरे, अभय सांळुके, लक्ष्मण कांबळे, अनुप शेळके, सर्जेराव मोरे, इम्रान सय्यद, सचिन बंडापल्ले, व्यकंटेश पुरी, प्रविण सुर्यवंशी, ड. प्रमोद जाधव, मुकेश राजेमाने, प्रा.एकनाथ पाटील, मनोज राठोड, राम स्वामी, कुणाल श्रृगारे, राम गोरड, यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## देशातील महिला शक्ती निर्णायक : भाजपा महिला प्रदेशाध्यक्षा सौ. चित्राताई वाघ

अहमदपुर/प्रतिनिधी : देशात महिलांची संख्या ५० टक्के आहे. याचाच अर्थ सर्वच क्षेत्रात महिलांचा वाटा अर्धा आहे. २०१४ पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी या शक्तीकडे सपशेल दूर्लक्ष केले. पण नरेंद्र मोदी यांनी महिला शक्तीला वंदन करत आरक्षणासह विविध सुख सोयी मिळवून दिल्या. ही महिला शक्ती निर्णायक असून भाजपच्या विजयात महिलांचा वाटा निर्णायक ठरणार आहे, असे प्रतिपादन भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांनी केले. भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ अहमदपूर शहरातील सानवी मंगल कार्यालयात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ बोलत होत्या. मंचावर महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर, महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस रेखाताई तरडे, सौ. सुप्रिया पायाळ, ॲड. जयश्री पाटील, माजी सभापती सौ. अयोध्याताई केंद्रे, माजी नगराध्यक्षा सौ. अश्विनीताई कासनाळे, महिला मोर्चा तालुकाध्यक्षा जयश्री केंद्रे, चाकूर तालुकाध्यक्षा मनिषा नवणे, जिल्हा उपाध्यक्षा पुष्पाताई तेलंग, जिल्हा सरचिटणीस प्रणिता बेंबळगे, राष्ट्रवादी महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सौ. मिनाक्षी शिंगडे, तालुकाध्यक्षा शाहूताई कांबळे, धनश्री आर्जूने, मीनाताई भोसले, संध्या राजपूत, महिला मोर्चा शहराध्यक्षा सौ. कल्पना महाजन, सौ. अवंतीताई कुलकर्णी, सत्यभामा चिंते, सौ. आशाताई रोडगे, सौ. दैवशाला शिंदे, सौ. मिनाक्षी तौर, लक्ष्मी पांचाळ यांची उपस्थिती होती. उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना चित्राताई म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी महिलांची सर्वकष काळजी घेत आहेत. महिलांसाठी त्यांनी विविध योजना सुरू केल्या आहेत. अगदी






महिला गर्भवती राहिल्यापासून तिच्या पोषण आहाराची काळजी घेणारी योजना केंद्र सरकारने सुरू केलेली आहे. मुलींसाठी सुकन्या योजना राबवून महिलांचा सन्मान करण्यात आला आहे. पंतप्रधान आवास घरकुल योजना ही सुद्धा महिलांच्याच नावाने सुरू केली असून ११ कोटी स्वच्छतागृह बांधून देत महिलांची होणारी बेअब्रू थांबविण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. हर घर नल योजनेच्या माध्यमातून महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा उतरवून प्रत्येक गावात, प्रत्येक घरी पाणीपुरवठा केला जात आहे. कोरोनाच्या काळात मोफत लस देऊन जनतेला जीवनदान देण्याचे काम मोदी सरकारनेच केले आहे. ८० कोटी भारतीयांना मोफत अन्नधान्य पुरवठा करुन जनतेला मोठा दिलासा देण्याचे कार्य याच सरकारने केले आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच महिलांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात कार्य झाले असून देशातील महिलांना याची जाणिव आहे. त्यामुळेच या निवडणुकीत भारतातील महिला शक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या पाठीशी उभी असल्याचे चित्राताई म्हणाल्या. लातूर लोकसभेसाठी दि. ७ मे रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहनही चित्राताई वाघ यांनी केले. यावेळी बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, ज्या कारणासाठी जनतेने निवडून दिले ते सार्थकी लावण्याचे कार्य खा. शृंगारे यांनी केले आहे. ते संसदेत १०० टक्के उपस्थित राहिले. मतदारसंघातील कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी त्यांनी खेचून आणला, असेही त्या म्हणाल्या. या मेळाव्यास भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना तसेच महायुतीतील सर्व पक्षाच्या महिला आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या आणि अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मेळाव्याचे प्रास्ताविक भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस रेखाताई तरडे, सूत्रसंचलन सौ. संगीता आबंदे तर आभार भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांनी मानले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी धैर्यशील देशमुख, डॉ. सिद्धार्थ सुर्यवंशी, निखिल कासनाळे, अमित रेड्डी, श्रीकांत देशमुख, द्वारकादास नाईक यांच्यासह भाजपा महायुतीच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## कृषी उत्पन्न बाजार समितीत डॉ.काळगे यांचे जंगी स्वागत



लातूर : प्रतिनिधी लातूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांनी दि.२४ एप्रिल रोजी सायंकाळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील आडते, खरेदीदार, व्यापारी, गुमास्ता, हमाल, मापाडी यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरातील गौरी-शंकर मंदीरात जाऊन आरती केली. त्यानंतर त्यांनी आडते, खरेदीदार, व्यापारी, गुमास्ता, हमाल, मापाडी यांची प्रत्येक्ष जाऊन सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी आडत बाजारातील सर्वच घटकांकडून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. डॉ. शिवाजी काळगे यांना आडते, खरेदीदार, व्यापारी, गुमास्ता हमाल, मापाडी, शेतकरी यांच्याकडून उत्स्फर्त प्रतिसाद मिळाला. फटाक्यांच्या आतषबाजीने व पुष्पहाराने डॉ. शिवाजी काळगे यांचे ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, संचालक सुधीर गोजमगुंडे, आडत असोशिएशनचे अध्यक्ष चंद्रकात पाटील, गुमास्ता मंडळाचे अध्यक्ष तुळसीराम गंभीरे, गुमास्ता मंडळाचे उपाध्यक्ष संजय माने, ज्योतीराम कदम, भाऊराव लवटे, सुरेश धानुरे, दिनकर मोरे, चंद्रकांत सुर्यवंशी, अमर पवार, गुलाब मोहिते, सुरेश ढमाले, कालीदास खाडप शरद जगताप, सोनाळे, बंडु देशमुख, नेताजी जाधव, हर्षवर्धन सवई, शिवाजी कांबळे आदी उपस्थित होते.

## महिलांना सन्मान देणाऱ्या नरेंद्र मोदीजीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे - डॉ. अर्चना पाटील चाकूरकर

लातूर दि.२४- जिव्हाळ्याच्या प्रश्नाची सोडवणूक करून महिलांना सन्मान आणि प्रोत्साहन देणारे देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या पाठीशी महिलांनी खंबीरपणे उभे राहावे, त्यांना मोठे समर्थन द्यावे असे आवाहन भाजपाच्या नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे निवाडा येथे लोकसभा निवडणुकीतील भाजपा महायुतीचे उमेदवार खासदार सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारानिमित्त महिला मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात डॉ. अर्चना पाटील चाकूरकर बोलत होत्या, याप्रसंगी भाजपाच्या नेत्या संजीवनीताई रमेशआप्पा कराड, सुप्रियाताई शृंगारे, भाजपा महिला आघाडीच्या उषाताई रोडगे, अनुसया फड, सुरेखा पुरी, शीला आचार्य त्याचबरोबर भाजपाचे तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, रिपाईचे धम्मानंद घोडके, सिंदगावचे सरपंच सुनील चेवले, बावचीचे उपसरपंच नरेश चपटे, कोळगावचे पंकज काळे, शेरा येथील सरपंच प्रताप भुरे, भीमराव मुंडे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. महिला मेळाव्यास महिलांची मोठी उपस्थिती होती.

नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात केंद्रात सत्ता आल्यानंतरच मोठे विकासात्मक बदल घडले. महिलांचे दुःख कमी झाले, अडचणीवर मार्ग निघाले असे सांगून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, केंद्र आणि राज्य शासनाने महिलांना केंद्रबिंदू मानून घरकुल, शौचालय, घरोघरी गॅस, मोफत अन्नधान्य प्रवासात ५० टक्के सवलत असे अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले., महिला उद्योजकांना प्रोत्साहन दिले. आपल्या सर्वांची आस्था असलेले प्रभू श्रीरामाचे भव्य दिव्य मंदिराची आयोध्या नगरीत उभारणी केली. विधानसभा आणि लोकसभा सभागृहात काम करण्यासाठी महिलांना ३३ % आरक्षण देणारे विधेयक मोदीजींच्या सरकारने मंजूर केले.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी देशाच्या प्रगतीसाठी आपल्या भावी पिढीच्या कल्याणासाठी पुन्हा एकदा नरेंद्रजी मोदी पंतप्रधान होणे ही काळाची



गरज आहे. तेव्हा लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार खासदार सुधाकर शृंगारे यांना प्रचंड बहुमताने विजयी करून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना शुभ आशीर्वाद द्यावेत, त्यांच्या कामांना समर्थन द्यावे असेही आवाहन अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

प्रारंभी तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष अनुसया फड, विस्तारक दिलीप पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करून भाजपा महायुतीलाच साथ द्यावी खा. सुधाकर शृंगारे यांना बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले. मेळाव्याचे सूत्रसंचालन संगमेश्वर स्वामी यांनी केले या महिला मेळाव्यास प्रतिभा उरगुंडे, सुनिता उरगुंडे, माहीम शेख, शोभा नवाडे, सुरेखा कस्पटे, सखुबाई बडे, मनीषा कारसेकर, संगीता घाटोळे, यमुना कस्पटे, रेश्मा शेख, उमा सूर्यवंशी, वंदना सूर्यवंशी त्याचबरोबर विठ्ठल कस्पटे, शिवमुर्ती उरगुंडे, पृथ्वीराज उरुगुंडे, रसूल शेख, लक्ष्मीकांत उरगुंडे, बाळू गिरी, राजाभाऊ घाटोळे, सतीश कस्पटे, अविनाश उरगुंडे, दयानंद लकडे, बाळू आप्पा माशाळकर यांच्यासह महिला पुरुष भाजपा आणि मित्र पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वत:च्या गावचा रस्ताही करता आला नाही त्यांनी विकासाच्या गप्पा मारू नये : आ. संभाजी पाटील निलंगेकर

निलंगा/प्रतिनिधी : काँग्रेसने फक्त जाती-पातींचे राजकारण केले. विकास काय असतो हे त्यांना ठावूकही नाही. ज्यांना स्वतःच्या गावाचा रस्ताही करता आला नाही त्यांनी विकासाच्या गप्पा मारू नयेत, असे प्रतिपादन लातूर लोकसभा संयोजक माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले. लातूर लोकसभेचे भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ निलंगा विधासभा मतदार संघातील येरोळा व साकोळ या गावांमध्ये आयोजित कॉर्नर बैठकांमध्ये आ. निलंगेकर बोलत होते. यावेळी उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचीही त्यांच्यासमवेत उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, साकोळवासियांच्या आदेशाचे आजपर्यंत पालन आम्ही केले आहे. या भागातील नागरिकांनीही आमच्यावर तेवढेच प्रेम केलेले आहे. येथील सर्वसामान्य नागरिक कायमच भाजपाच्या पाठीशी उभा राहिलेला आहे. डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी भाजपामध्ये प्रवेश केल्यापासून काँग्रेसच्या बॅनरवरील चाकूरकर साहेबांच्या फोटोचा आकार वाढू लागला आहे. यातूनच त्या पक्षाने कोणाला काय दिले किंवा कोणाचा विकास केला हे दिसून येते. आता केवळ निवडणुकीत त्यांना चाकूरकर



साहेबांची गरज भासत असल्याचे ते म्हणाले. या निवडणुकीत नरेंद्र मोदींना तिसर्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी ग्रामस्थांना केले. तत्पूर्वी खा. शृंगारे, आ. निलंगेकर व मान्यवरांनी साकोळ येथील बुद्ध विहार येथे दर्शन घेतले. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून नमन केले. महात्मा बसवेश्वरांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून ते नतमस्तक झाले. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजी माने, राष्ट्रवादीचे पंडित धुमाळ, जिल्हा सरचिटणीस भारत चामे, ॲड. संभाजी पाटील, जयश्रीताई पाटील, माजी सभापती संजय दोरवे, गोविंद चिलकुरे, तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, सुधीर पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.

## संपादकीय....

# चीनची निवडणूक लुडबुड

गेल्या काही वर्षांत संपूर्ण जगात चीनच्या हेरगिरीचा आणि हस्तक्षेपाचा धोका ही चिंतेची बाब बनली आहे. स्पाय बलूनद्वारे अमेरिकेची हेरगिरी करण्याचे प्रकरण असो किंवा आशिया खंडातील छोट्या देशांच्या राजकारणातील लुडबुड असो, चीनच्या या कुटिल कारवायांची डोकेदुखी वाढत चालली आहे. आता तैवानमध्ये पार पडलेल्या यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही चीनने एआयच्या माध्यमातून हस्तक्षेप केल्याची माहिती पुढे आली आहे.

एकविसाव्या शतकात संपूर्ण जगासाठी डोकेदुखी ठरलेल्या आणि धोका बनलेल्या चीनच्या कुरघोड्यांचे नवनवीन प्रकार नित्यनेमाने समोर येत असतात. चीन हा एकाच वेळी अनेक पातळ्यांवर युद्धनीती आखून चाली खेळत असतो. यामध्ये सायकॉलॉजिकल वॉरफेअर, इन्फर्मेशन वॉर, सोशल मीडिया वॉरफेअर, हेरगिरी, सायबर वॉरफेअर अशा अनेक प्रकारे चीन शत्रू देशांना अडचणीत आणण्याचा किंवा त्यांची माहिती चोरण्याचा, तेथील लोकसमुदायांमध्ये गैरसमज पसरवून त्यांच्यात राष्ट्रविरोधी भावना भडकावण्याचा प्रयत्न करत असतो. याखेरीज बदलत्या काळातील तंत्रज्ञानाचा नवआविष्कार म्हणून पुढे आलेल्या एआयचा वापरही चीन याच कुटिल हेतूने करत असल्याचे समोर आले आहे.

चीन सोशल मीडियाच्या माध्यमातून एआयद्वारे तयार केलेल्या सामग्रीचा वापर करून जनमतावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतो. ‘स्टॉर्म–१७’ या नावाने ओळखल्या जाणार्या गटाकडून तैवानच्या निवडणुकांमध्ये एआयच्या मदतीने बनवलेले बनावट ऑडिओ सपोर्ट आणि मिम्स आदी सामग्री प्रसारित केली गेली. काही उमेदवारांची बदनामी करणे आणि मतदारांच्या धारणा प्रभावित करणे, हा त्या मागचा उद्देश होता. तैवानच्या निवडणुकीदरम्यान ‘बीजिंग–गट स्टॉर्म–१७’ने तैवानच्या तत्कालीन डेमॉक्रेटिक प्रोग्रेसिव्ह पार्टीचे अध्यक्षपदाचे उमेदवार विल्यम लाई यांच्या विरोधात दुष्प्रचार केला. फेब्रुवारी पासून ‘स्टॉर्म–३६’ने एआय टीव्ही न्यूज अँकर तैनात केले आणि त्यांनी दुष्प्रचार करण्याचा वेग वाढवला. आता प्रश्न उरतो तो तैवानच्या निवडणुकीत चीनने केलेल्या ढवळाढवळीला किती यश मिळाले? मायक्रोसॉफ्टच्या अहवालानुसार, चीनला निवडणुकीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात यश आले नाही. तरीही या हस्तक्षेपाचा निवडणुकीवर काही प्रमाणात परिणाम झाला, असे मानले जाते. चीनद्वारे तैवान निवडणुकीत केला गेलेला हस्तक्षेप भारतासाठी एक अभ्यासाचा विषय असून, त्यापासून आपण खूप शिकू शकतो. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनने अमेरिकन निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप केलेला आहे.

ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनाक यांनी अशाच प्रकारचा आरोप चीनच्या विरोधात केला आहे. चिनी गट सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा फायदा घेत समाजात फूट पाडणारे प्रश्न निर्माण करतात आणि मतदारांच्या मानसिकतेविषयी गुप्त माहिती गोळा करतात आणि नंतर त्या–त्या भागाला अनुरूप असा दुष्प्रचार करतात. अमेरिकन निवडणूक प्रचारात एआयचा वापर नवीन नाही. २२ च्या न्यू हॅम्पशायर डेमोक्रॅटिक प्रायमरीत आघाडीवर, एआयद्वारे तयार केलेल्या फोन कॉलने राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्या आवाजाची नक्कल केली आणि मतदारांना मतदानात सहभागी होण्याविरुद्ध सल्ला दिला. नोव्हेंबरमध्ये होणार्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदारांनी त्यांची मते रोखून ठेवावीत, असा या कॉलने चुकीचा इशारा दिला.

उत्तर कोरियाच्या सहभागासह चिनी राज्य–समर्थित सायबर गट अनेक निवडणुकांना लक्ष्य करतील, अशी शक्यता आहे; कारण चीनला त्या–त्या देशात चिनी समर्थकांना निवडणूक जिंकण्यासाठी मदत करायची आहे. राजकीय पक्ष चीनविरोधात आहेत, त्यांच्या विरोधात एआयच्या मदतीने दुष्प्रचार युद्ध करून त्यांना हरवायचे आहे. म्हणजे तंत्रज्ञानाची महाशक्ती असलेल्या अमेरिका आणि तैवानसारख्या देशांमध्ये चीनने एआयचा वापर करून मतदारांची दिशाभूल करण्यात काही प्रमाणात यश मिळवले. चीनची ताकद एवढी मोठी असेल तर भारताला नक्कीच सावध राहावे लागेल.

मायक्रोसॉफ्ट या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील दिग्गज कंपनीने भारत, दक्षिण कोरिया आणि अमेरिका या देशांमध्ये यंदाच्या वर्षी होणार्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून चीन हस्तक्षेप करू शकतो, असा इशारा दिलेलाही आहे. यंदाच्या वर्षी जगभरातील किमान सहा देशांमध्ये राष्ट्रीय निवडणुका होणार आहेत. गेल्या महिन्यात मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेटस् यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतली आणि सामाजिक कारणांसाठी एआयचा वापर, महिलांच्या नेतृत्वाखालील विकास आणि आरोग्य व कृषी क्षेत्रातील नवकल्पना यांवर चर्चा केली. निवडणुकांदरम्यान प्रभाव वाढवण्यासाठी चीन एआयने तयार केलेली दुष्प्रचार करणारी सामग्री तैनात करेल.

एआयचा वापर करून फसव्या आणि खोट्या सामग्रीच्या निर्मितीसाठी राजकीय जाहिरातींद्वारे उद्भवलेला धोका, ज्यामध्ये डीपफेक किंवा कधीही न घडलेल्या घटनांचा समावेश आहे. उमेदवारांची न केलेली विधाने, विविध मुद्द्यांवरची त्यांच्या भूमिका आणि काही घटनांच्या सत्यतेबाबत जनतेची दिशाभूल करणे हा डावपेचाचा उद्देश आहे. यामुळे मतदारांच्या मनावर परिणाम होतो. भारताच्या सार्वत्रिक निवडणुका सुरू झाल्या असून, त्यांचे निकाल ४ जून रोजी जाहीर होणार आहेत. निवडणूक प्रक्रिया सात टप्प्यांत होईल. भारताच्या निवडणूक आयोगाने चुकीची माहिती त्वरित ओळखण्यासाठी आणि प्रतिसाद देण्यासाठी आधीच मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रोटोकॉल जाहीर केले आहेत. भारताच्या निवडणुकीत चीनची ढवळाढवळ थांबवण्यासाठी भारताने ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

# ....तर अधिकाऱ्यांनो संडास साफ करणार का?

# मराठवाड्याची दादागिरी लोकसभेत चालणार का?

वाशीम हो खर आहे..तर अधिकार्यांनो संडास साफ करणार का? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे ते केवळ नांदेड जिल्ह्यात घडलेल्या मागासवर्गीय अधिष्ठाता संडास साफ प्रकरणाने... नांदेड येथील शासकीय रुग्णालय व महाविद्यालयात खासदार हेमंत पाटील यांनी दहशत निर्माण करत मागासवर्गीय अधिकार्यांना टार्गेट केले.अधिष्ठाता डॉ.वाकोडे याना खासदार हेमंत पाटील यांनी संडास साफ करायला भाग पाडल्याने एकच खळबळ उडाली. महाराष्ट्राभर पडसाद उमटलेले.विविध स्तरातून खासदार हेमंत पाटील यांचा निषेध नोंदविण्यात आला.विविध संघटना आक्रमक झाल्यात. अखेर सदर प्रकरणी खासदार हेमंत पाटील यांच्यावर अट्रोसिटी अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते.सदर प्रकरणावरून हेमंत पाटील मागासवर्गीयाचा द्वेश करणारे आहेत का? असा मत प्रवाह निर्माण झाला. सदर प्रकरणी हेमंत पाटील यांची मानसिकता अधोरेखित करणारी आहे.

हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील वादग्रस्त असलेले व्यक्तिमत्व. नांदेड जिल्ह्यासह हिंगोली जिल्ह्यात एक दहशत...दादागिरी....पैसा आणि सत्तेची उर्मी असल्याची चर्चा आहे.खासदार हेमंत पाटील यांच्या वादग्रस्त व्यक्तिमत्व मुळे की काय त्यांना हक्काच्या हिंगोली लोकसभा मतदार संघात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी विरोध केल्याने त्यांची उमेदवारी रद्द झाली.हिंगोलीची उमेदवारी हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील याना न देता यवतमाळ वाशीम लोकसभेची उमेदवारी बहाल का करण्यात आली? हे समजण्या इतपत जनता दूध खुळी नाही.हे एक भाजपा ने शिवलेले षडयंत्र तर नव्हे ना? असा सूर येत आहे.

यवतमाळ वाशीम लोकसभेची उमेदवारी महायुतीकडून शिंदे गटाच्या राजश्री हेमंत पाटील याना जाहीर झाल्यापासून विविध चर्चेला उधाण आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हेमंत पाटील यांची उमेदवारी रद्द करून यवतमाळ हिंगोली लोकसभेची उमेदवारी राजश्री पाटील याना बहाल केल्याने राजश्री पाटील याना निवडणूक आणण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावल्याचे दिसत आहे.एकनाथ शिंदे यांनी मतदार संघात प्रचारसभा,सिने अभीनेत्याचे रोडशोचा धडाका लावला.महाविकास आघाडीच्या वतीने शिवसेना ठाकरे गटाचे संजय देशमुख यवतमाळ वाशिम लोकसभेचे उमेदवार आहेत.त्यांनी संपूर्ण मतदार संघ पिंजून काढल्याने त्याचे पारडे जड दिसत असल्याने विरोधकांत धडकी भरली आहे.




---

**मंत्री अब्दुल सत्तारांशी भिडले**

हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री व त्यांच्याच पक्षाचे मंत्री अब्दुल सत्तार यांच्याशी जिल्हा नियोजन समितीत हेमंत पाटील यांचा निधीवाटपावरून वाद झाला होता. तेव्हा सत्तार यांचा एकेरी उल्लेख करीत, तू ये इकडे तुला दाखवतो, असे म्हणत पाटील यांनी त्यांना आव्हान दिले होते. याची ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर चांगलीच खळबळ उडाली होती.

# राजकीय–वित्तीय लोकशाहीच्या मिलाफासाठी..

निवडणुकांच्या काळातही प्राप्तिकरासंदर्भातील सुधारणांविषयी कोणतीही चर्चा होताना दिसत नाही आणि त्यात आश्चर्य वाटण्यासारखेही काहीही नाही.

अणुबॉम्बच्या जनकांपैकी एक मानल्या जाणार्या ओपेनहायमर यांच्यावर आधारित ‘ओपेनहायमर’ या पुरस्कार विजेत्या चित्रपटात त्यांच्या देशाबद्दलच्या निष्ठेवर आणि कम्युनिस्टांबद्दल त्यांना असलेल्या सहानुभूतीवर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे. एका ओळीत ते म्हणतात, ‘‘मी कम्युनिस्ट नाही, तर ‘न्यू डील’चा समर्थक आहे.’’ त्यांच्या या वाक्याला, त्यातील ‘न्यू डील’ला अर्थातच राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट यांच्या सरकारने हाती घेतलेल्या मोठ्या कल्याणकारी विस्तार कार्यक्रमाचा आणि सार्वजनिक बांधकाम प्रकल्पांचा संदर्भ आहे. या कार्यक्रमामुळे अखेरीस अमेरिकेला मोठ्या मंदीतून अर्थातच ‘ग्रेट डिप्रेशन’मधून बाहेर पडणे शक्य झाले. औद्योगिक पातळीवर परिस्थिती बदलण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाठिंबा देण्याव्यतिरिक्त, या कार्यक्रमाने बेरोजगार, तरुण, शेतकरी आणि वृद्धांना संरक्षण देण्यासाठी सामाजिक सुरक्षा प्रणाली सुरू केली. एरवी पुराणमतवादी असलेल्या अमेरिकेसाठी हे मूलगामी बदल होते. आर्थिक पातळीवर संपन्न असलेल्या शास्त्रज्ञ ओपेनहायमर यांची अशा कल्याणकारी खर्चाचे समर्थन करण्यात कोणतीच हरकत नव्हती. या नव्या कार्यक्रमाला अमेरिकन समाजातील सर्व स्तरांचा पाठिंबा होता. कुणीही या कार्यक्रमाकडे ‘पॉलला पैसे देण्यासाठी पीटरला लुटले जाते आहे’ या दृष्टिकोनातून पाहिले नाही. हा सगळा श्रीमंत, कर भरणारा वर्ग होता आणि त्याने केवळ कल्याणकारी खर्चाला पाठिंबाच दिला नाही तर स्वत:ला त्याचा अप्रत्यक्ष लाभार्थी म्हणूनही पाहिले. भारतात सरकारच्या कल्याणकारी कार्यक्रमांचे लाभार्थी आणि अशा कार्यक्रमांना निधी देणारे सत्कृत्य दाते यांच्याबाबतीत काय आहे? चला तपासू या.आपण कल्याणकारीच गेल्या दहा वर्षांत भारताची आर्थिक वाटचाल अधिकाधिक कल्याणकारी आहे, हे स्पष्ट दिसते आहे. २०१७ च्या आर्थिक सर्वेक्षणाच्या एका प्रकरणात सार्वत्रिक किमान उत्पन्नाच्या कल्पनेला महत्त्व देऊन तिची भरपूर चर्चा करण्यात आली होती. त्यामुळे तिची मोठी बातमी बनली. तत्कालीन मुख्य आर्थिक सल्लागार, अरविंद सुब्रमण्यन यांनी लिहिले, ‘‘सामाजिक न्याय आणि उत्पादक अर्थव्यवस्था या दोहोंचा विचार करताना सार्वत्रिक किमान उत्पन्न हे मूलगामी आणि महत्त्वपूर्ण ठरू शकते. विसाव्या शतकात नागरी आणि राजकीय अधिकारांना जे महत्त्व होते, तेच सार्वत्रिक किमान उत्पन्नाला एकविसाव्या शतकात असू शकते.’’ प्रस्तावित योजनेत सार्वत्रिकता, बिनशर्तता आणि यंत्रणा या तीन प्रमुख कल्पना आहेत. यात प्राप्तकर्त्यांने उत्पन्न कसे खर्च करावे यावर कोणतेही बंधन नाही. हे व्हाउचर–आधारित पद्धतीच्या विरुद्ध आहे. व्हाउचर–आधारित पद्धतीत कल्याणकारी योजनेच्या लाभार्थ्यांनी केवळ त्याला ठरवून दिलेल्या वस्तू आणि सेवांवर खर्च करणे अपेक्षित आहे. सार्वत्रिक किमान उत्पन्न ही संकल्पना अद्याप औपचारिकपणे आणली गेलेली नाही परंतु लवकरच ती येऊ शकते. सार्वत्रिक किमान उत्पन्नाचे पथदर्शी प्रकल्प २०११–१२ मध्ये काही प्रमाणात यशस्वी झाले.

# लोकसभा निवडणुकीत आपला मुख्य शत्रू कोण?

भारतीय राजकारणात आपला मुख्य शत्रू कोण?.हेच ओळखणे अशक्य झाले आहे. सत्तेचा लाभ घेण्यासाठी कोण कधी एकत्र येतील हे समजणे व सांगणे कठीण आहे. लोकसभा निवडणुकीत जगाचे लक्ष वेधून ठेवत आहे.कलानगरचे स्वयं घोषीत हिंदू हृदय सम्राट आणि राष्ट्रीय हिंदुत्ववादी मनुवादी होलसेल ठेकेदार यांची रेशमी धाग्याने मागासवर्गीय समाजाला बांधून ठेवनारी पंचवीस वर्षाची युती मराठी माणसाला दाखविण्या करीता किती वेळा तुटली व घोडेबाजार होऊन जोडल्या गेली.आज मात्र नांव निशाणी चिन्हा सह कायद्याच्या चौकटीत संपविल्या गेली. त्यामुळेचे कोण कोणाचा कोणत्या विचारांचा शत्रू आणि मित्र आहे जाणकारांना कळणे कठिण आहे. तिथे श्रम विकणाऱ्या पाचशे रुपये मजुरी घेणाऱ्यांना कष्टकरी कामगार,मजुरांना काय समजणार आहे. पाचशे रुपये,व दारू मटन मिळते म्हणून मतदान करणारे मतदार पांच वर्ष सरकारला शिव्या देण्यास जबाबदार असतात काय?. केंद्रात आणि राज्यात छत्रपतीचा आशीर्वाद मागणारे सत्ताधारी झाले होते. त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे काल ही काही घेणे देणे नव्हते आणि आज ही नाही. त्यामुळेच महाराष्ट्रातील मराठी माणसांचे काय झाले?.हे मतदारांनी विसरू नये. बहुजनांच्या मागासवर्गीयांच्या बाजुने शिवसेना भाजपा काँग्रेस कधी लढली नाही. म्हणजेच हे कौरव पांडव आहेत.कौरव पांडव जनतेसाठी लढले नाही.ते फक्त त्यांच्या फायद्या करीता जनते समोर भांडण्याचे नाटक करतात.बाकी सर्व वाटून खातात. म्हणुन वंचित बहुजन समाजातील मागासवर्गीय मतदारांनी कौरव पांडवांची जात पाहून मतदान करावे. हे एकाच जातीचे आणि धर्माचे आहेत. ते हिंदू कधीच नव्हते.ते फक्त ब्राम्हण आहेत.आणि ब्राम्हणच राहतील.वंचित बहुजन कितीही मोठा उच्चशिक्षित, या उधोगपती किंवा राष्ट्रपती असला तरी वंचित शोषित मागासवर्गीयच राहील हे मतदारांनी लक्षात ठेवावे राजकारणात जात धर्म नसते. विचारधारा असते. त्यानुसार समाजाच्या आर्थिक नाड्या हाती घेऊन समाजात जाऊन समाजप्रबोधन,जागृती करण्याचा पहिला नियम आहे.

लोकसभा निवडणुकीत आपला मुख्य शत्रू कोण?. शत्रूच माहित नसेल तर लढाई कोणा बरोबर लढणार?. काँग्रेस,भाजपा आणि कम्युनिस्ट कधीच वैचारिक शत्रु नव्हते आणि नाही.सर्व पक्षात वैचारिक वर्चस्व ब्राम्हणाच्या हाती राहून बहुजन मागासवर्गीय समाजावर नियंत्रण ठेवण्याचे काम हे पक्ष संघटना करतात. काँग्रेसचा सर्वात मोठा नेता ब्रॉरिस्टर मोहनचंद करमचंद गांधी महात्मा झाल्यावर मारल्या गेला त्याला कोणा कोणाची साथ होती?. हे राम वाले आता खुलेआम नथुरामचा जयजयकार करतात.या मागील सत्य वैचारिक शक्ती कोणती ते समजून घ्या.ती जर नसती तर आज देशात मनुवादी हिंदुत्ववादी कौरव पांडवांची उत्पत्ती झालीच नसती. म्हणून या तिन्ही राष्ट्रीय पक्ष संघटनेचा वैचारिक पाया एकच आहे पण काम करण्याची पद्धत वेगळी वेगळी आहे.हे महात्मा ज्योतीराव फुले आणि डॉ बाबासाहेबांनी वेळोवेळी सिद्ध करून दाखविले.म्हणून कोणत्या पक्षात संघटनेत आपला शत्रु आहे.हे या देशातील बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय समाजाला समजत नाही. म्हणुन कामगार क्षेत्रातील बलाढ्य राष्ट्रीय संघटना, भांडवलदारांच्या विरोधी लढतांना दिसतात पण मनुवादी हिंदुत्ववादी ब्राम्हणवादा विरोधात लढतांना दिसत नाही. महात्मा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते देशाचे दोनच शत्रू आहेत. एक भांडवलशाही दुसरी ब्राम्हणशाही हे सर्वच क्षेत्रात हातात हात आणि गळ्यात गळा घालून काम करून सत्तेवर नियंत्रण ठेवतात.

राज्य आणि केंद्रातील मंत्रीमंडळातील नांवावर काळजीपूर्वक नजर टाका व कोणत्या जातीचे वर्चस्व आहे ते पहा.म्हणजे कौरव पांडवांच्या सत्ता संघर्षात आपण बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय कोण आहोत?.तर वंचित बहुजन मागासवर्गीय या तिन्ही पक्ष संघटनेत आहेत.त्यांची समाजात किंमत काय?.कोणत्या जातीतील नेत्याचा व्यक्तिगत आर्थिक विकास होऊन कल्याण झाले.पण त्या त्या समाजाचे काय?. त्याला तर हा नेता आणि त्यांचा पक्ष संघटना सतत वापर करून मूर्ख बनविते म्हणुन देशात सार्वजनिक उधोगधंद्याचे खासगीकरण औधोगिकरण, जागतिकीकरण मोठया प्रमाणत झाले आहे.कारण शोषण करणारे आणि शोषणकरू देणारे बहुसंख्य एकाच पक्षात आणि संघटनेत काम करतात.म्हणून वंचित बहुजनांनी आपली स्वतःची ओळख निर्माण केली पाहिजे, लोकसभा निवडणूकीत आपला उमेदवार आणि पक्ष निवडला पाहिजे. सत्ताधारी पक्षाची नीती आणि विरोधी पक्षाची नीती एकच आहे.बहुसंख्य वंचित बहुजन मागासवर्गीय कामगार कर्मचारी यांनी सरकारची नीती आणि सत्ताधारी यांची नीतीचा मतदार म्हणुन शत्रुच्या विरोधात जनआंदोलन सोबत निवडणूकीत एकझुट दाखविली असती.तर मनुवादी हिंदुत्ववादी शक्ती मोठया संख्येने निवडून आली नसती. मराठी माणसाच्या न्याय,हक्कसाठी लढणारी शिवसेना आणि मराठी हृदय सम्राटानी मराठी माणसाच्या काम धंदा आणि नोकरी करीता काय केले?. मुंबईतील सर्व स्टेशन रोडसह रोडवरील जागा उत्तर भारतीयांना काम धंद्या करीता सात बारा कोणी दिला?.मराठी माणसाला रेशनकार्ड, गुमस्ता,आदिवास दाखला सहज मिळत नाही. मग उत्तर भारतीय आणि इतर राज्यातील माणसानां ते सहज कसे मिळते?.त्यांना कोणतीच गोष्ट अशक्य नाही. कारण मुंबई फक्त भ्रष्टाचार करूनच कामकाज करते.त्यात मराठी माणुस कमी पडतो. गेल्या पन्नास वर्षापासुन मराठी माणसाचे आणि भाषेचे ठेकेदार असली शिवसेना काम धंदा नोकरी देण्यास कमी पडली?. नाही त्यांनी गणपती,दहीहंडी आणि पायी पालकी पदयात्रा सारखे लक्षवेधी उत्सवी उधोगधंदे मराठी तरुणांना देण्यास प्रेरणादायी करून ठेवले.हेच तिचे जगाच्या औधोगिक आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईची ओळख जागतिक पातळीवर नेली.हेच तिचे मराठी माणसा करीता ऐतिहासिक काम आहे.



छत्रपती शिवाजी महाराज त्यांचे आराध्य दैवत असेल तर राष्ट्रमाता जिजाऊच्या चरित्र हरण करणाऱ्यांना त्यांनी काय शिक्षा दिली हे मराठी माणूस म्हणुन प्रश्न विचारण्याचा हक्क मुंबईसह महाराष्ट्रातील मतदाराला असला पाहिजे.छत्रपती शिवाजी महारजांचे अवतारी पुरुषात रूपांतर कोणी केले?. जहागीर नांव ठेवले म्हणून सोशल मिडियावर रान पेटविणारे,कुत्र्याला शंभू नांव देण्याची हिंमत कोणी कशी काय करू शकतात,त्यावेळी हेच लोक कोणत्या बिळात असतात.कारण सत्ता केवळ लुटण्यासाठी नसते तर विकास आणि कल्याण करण्यासाठी असते.कौरव पांडवांच्या या सत्ता संघर्षात महाराष्ट्रातील मराठी माणसाला मतदाराला काय मिळाले?.तो कष्टकरी कंत्राटी कामगार मजूर म्हणूनच जगणार आणि मरणार आहे. पण मरतांना त्याची काही तरी नोंद असावी म्हणूनच मतदान करतांना आपले मित्र कोण आणि शत्रू कोण हा विचार करून मतदान करावे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर दोनवेळा लोकसभा निवडनूकीला उभे राहीले आणि दोन्हीही वेळा पराजित झाले. बाबू जगजिवनराम आठ वेळा लोकसभेला उभे राहीले आणि आठही वेळेस निवडून आले. इतकेच काय कायम केंद्रीय मंत्रीमंडळात राहिले. दोघेही मागासवर्गीय बहुजनांचे नेते पण आज आपण उपेक्षित,वंचित भटक्या, आदिवासी,मागासवर्गीय बहुजनांचे प्रेरणा स्थान म्हणून बाबासाहेबांना मानतो. बाबु जगजिवनराम यांना नाही.आंबेडकरवाद लाचारी शिकवत नाही. म्हणून हारुनही बाबासाहेब घरा घरात विराजमान आहेत. बाबू जगजिवनरामांचा फोटो काँग्रेस कार्यालयात ही नाही. तर त्यांच्या किंवा इतर समाजाच्या घरात फोटो आणि कोणता ही विचार नाही. म्हणुन तुम्ही सत्तेपेक्षा जनतेशी नातं जोडले पाहीजे. विचारधारेशी प्रामाणिक असले पाहिजे. महापुरुषांच्या क्रांतिकारी विचाराचे सैनिक झालेच नाही.जे स्वतःला वैचारिक सैनिक समजतात ते रक्षक नाही तर भक्षक झाले आहेत.क्रांतिकारी विचाराचे रक्षक लढून मरतील पण सिद्धांताची रक्षा करतील.समझोता तडजोड कधीच करणार नाहीत.म्हणजे जे समझोता तडजोड करतात ते महापुरुषाचे लायक औलाद नाही तर नालायक औलाद आहे हे सिद्ध होते.महापुरुषांच्या महात्मा क्रांतिकारी विचारांच्या देशात कौरव पांडवांचा इतिहास जिवंत होतो.हाच मोठा पराभव आहे. वंचित बहुजन समाजातील मतदारांनी मतदान करतांना भविष्यकाळ लक्षात ठेवून गांभीर्याने विचार करून मतदान करावे.

भारतीय लोकशाहीत भांडवलशाही ब्राम्हणशाही डोके वर काढते हे मतदारांना गुलाम बनविणारे तंत्र आहे.म्हणुन मतदारांनी कौरव पांडवांच्या लढाईत आपला खरा शत्रु कोण?. हे प्रथम ओळखले पाहिजे. आणि मतदान केले पाहिजे.राणीच्या पोटी राजा जन्म येण्याचे दिवस संपले असले तरी नगरसेवक,आमदार,खासदार यांच्या पोटी किंवा त्यांच्याच घरातील माणसाचा पहिला हक्क त्यांच्या मतदारसंघात असेल तर तिथे पक्ष संघटना काम करीत नाही.तर घराणे काम करते तेच सर्व निर्णय घेत असेल निवडणूक कसा करता घेतात.कौरव पांडवालाच सत्ता देयाची असेल तर मतदारांनी जागृत होऊन मतदान करावे. आणि कौरव पांडवा दोन्ही आपले शत्रु आहेत.हे प्रथम लक्षात घेऊन मतदान करावे.वंचित बहुजन समाज निवडणुकीत हरला तरी चालेल, पण त्यांची लक्षवेधी संख्या त्याच्या उमेदवाराला मिळालीच पाहिजे.तरच लोकशाही जिवंत राहील.

********

सागर रामभाऊ तायडे.
भांडूप,मुंबई,
९९२०४०३८५९.

# उमंग ऑटिझम सेंटर लातूर मार्फत ऑटिझम मुक्त अंगणवाडी शिबिराचे आयोजन.







लातूर :- ऑटिझम दिनाचे औचित्य साधत २ एप्रिल पासून लातूर जिल्ह्यात प्रत्येक अंगणवाडी केंद्रात जाऊन मोफत ऑटिझम स्क्रीनिंग तपासणी शिबिराचे आयोजन जिल्हाभरात करण्यात येत आहे ऑटिझम मुक्त लातूर हि संकल्पना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनमोल सागर सर व उमंग ऑटिझम सेंटरचे अध्यक्ष व लहान मुलांचे मेंदू विकार तज्ञ डॉ. प्रशांत उटगे यांची आहे आज पर्यंत जिल्ह्यातील विविध अंगणवाडी केंद्रातील अकराशे वीस बालकांची ऑटिझम तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ४५ बालकांना ऑटिझमचे लक्षणे दिसून आली आहेत. या बालकांना उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम अँड मल्टीडीसाबिलिटी रिसर्च सेंटर लातूर येथे विविध उपचार जसे की न्यूरोलॉजिकल ट्रीटमेंट, अर्लीइंटर्वेंशन, ऑक्युपेसनल थेरपी, स्पीच थेरपी, बिहेवियर थेरपी, सायकॉलॉजिकल थेरेपी, फिजियोथेरेपी, स्पेशल एज्युकेशन, व विशेष सेन्सरी पार्क या सर्व ट्रीटमेंट व थेरपी इत्यादी उपचार पद्धतीने उपचार देऊन बरे करण्यात येणार आहेत. आणि हेच शिबिर जिल्हाभरात अवांतर सुरू राहणार आहे. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा कार्यक्रमाधिकारी (महिला व बालविकास) श्री. जावेद शेख, उमंग ऑटिझम सेंटरचे सचिव किरण उटगे , उमंग सेंटर चे व्यवस्थापक ड. श्रीहरी गोरे, रामेश्वर जाधव, डॉ. श्रीशैलम तलारी, डॉ. गणेश डोंगरे, डॉ. दीप्ती मिस्कीन, डॉ. आचल बंते, डॉ. अर्जुन राठोड,डॉ. सुरेश बोराडे, डॉ. सुनील कांबळे, डॉ. प्रवीण राठोड इत्यादी. परिश्रम घेत आहेत.

## झटपट वजन कमी करायचंय? सकाळी उठल्या-उठल्या करा ‘या’ ६ गोष्टी; महिन्याभरात कमी होईल वजन, दिसाल स्लिम-ट्रिम!



सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अनेकांना एक गोष्ट सातत्याने सतावत असेल तर ते वजन. वाढलेले वजन अनेकांची डोकेदुखी झाली आहे. वजन कमी करण्यासाठी अनेक जण तासनतास जीममध्ये जाऊन घाम गाळतात. एवढंच नव्हे तर खाण्या-पिण्यावरसुद्धा नको तितकं नियंत्रण ठेवून डायटिंग केलं जातं. मात्र, तरीसुद्धा त्यांच्या पदरी निराशाच पडते. अशावेळी काय करावे? असा मोठा प्रश्न निर्माण होतो. वजन कमी करण्यासाठी दिवसभरातील इतर वेळेपेक्षा सकाळची वेळ अत्यंत महत्त्वाची आहे. या वेळेत तुम्ही काय करता, काय खाता पिता, तुम्ही कधी उठता या सर्वांचा परिणाम वजन कमी होण्यावर किंवा वाढण्यावर होतो. सकाळच्या वेळेचं महत्व लक्षात घेता वरिष्ठ सल्लागार डॉ. प्रणव होन्नावरा श्रीनिवासन हे सकाळच्या हेल्दी रुटीनमध्ये सहा गोष्टींचा आवर्जून समावेश करण्यास सांगतात. यामुळे तुमचं वजन झपाट्याने कमी होऊ शकते, असं त्यांच म्हणणं आहे. याबाबचे वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.डॉ. श्रीनिवासन म्हणतात, सकाळच्या काही वेगवेगळ्या सवयी आहेत, ज्या तुम्ही जलद वजन कमी करण्यासाठी तुमच्या दररोजच्या जीवनशैलीमध्ये समाविष्ट करू शकता. या सवयींना तुमच्या सकाळच्या दिनचर्येचा एक भाग बनवल्याने चयापचय आरोग्य, भूक नियंत्रण आणि एकूण ऊर्जा स्तरांवर परिणाम होऊ शकतात, ज्यामुळे वजन कमी होण्यास आणि आरोग्यास समर्थन मिळते. तुम्ही तुमच्या जीवनशैलीमध्ये सकाळी कोणत्या सवयींचा स्वीकार करावा जाणून घ्या वजन कमी करण्यासाठी सकाळीच करा ‘ही’ सहा कामे १. हायड्रेटेड रहा सकाळी उठल्यावर एक किंवा दोन ग्लास पाण्याने दिवसाची सुरुवात करा. ही सकाळची वजन कमी करण्याच्या सर्वोत्तम सवयींपैकी एक आहे. फक्त हायड्रेटिंग केल्याने तुमचे पचन सुरू होते, तुमचे चयापचय वाढते आणि तुमचे वजन कमी करण्याचा प्रयत्न वाढतो.२. उच्च प्रथिनेयुक्त नाश्ता खा तुम्ही नाश्त्यात जे खाता ते तुमच्या दिवसभराच्या खाण्याच्या सवयींवर परिणाम करू शकते. यामुळेच वजन कमी करण्यासाठी सकाळी आरोग्यदायी गोष्टी खाणे ही एक उत्तम सवय आहे. प्रथिनेयुक्त पदार्थ खाल्ल्याने तुम्हाला दीर्घकाळ पोट भरल्यासारखे वाटू शकते.३. सकाळी व्यायाम करा सकाळच्या वेळेत व्यायाम केल्यानं शरीराला जास्त ऊर्जा मिळून शरीरातील चरबी जळायला सुरुवात होते, त्याचा परिणाम म्हणजे वजन कमी होतं. ४. चांगली झोप घ्या वजन कमी करण्यासाठी चांगली झोप घेणेदेखील गरजेचे आहे. जर तुम्ही रोज रात्री ७-८ तास झोप घेतली तर यामुळे तुमची फॅट बर्निंगची प्रोसेस ही फास्ट होण्यास मदत होईल, त्यामुळे वजन नियंत्रित करण्यासाठी याचा फायदा होईल.५. सजग ध्यान दिवसाची सुरुवात ध्यानधारणेने किंवा खोल श्वास घेण्याच्या व्यायामाने केल्यास ताण कमी होतो, ज्याचा संबंध अनेकदा जास्त खाणे आणि वजन वाढण्याशी असतो. सरावामुळे शरीरातील ऊर्जा वाढते, लक्ष केंद्रित होतं, स्मरणशक्ती वाढते. यामुळे मनावर ताण येत नाही आणि वजनही वाढत नाही. ६. कोवळ्या उन्हात बसा-फिरा सकाळचं कोवळं ऊन अंगावर घेतल्यानं आजारांपासून लढण्यासाठी उपयुक्त ठरणारं व्हिटामीन डी मिळण्यास मदत होते. उन्हात बसल्यानं कॉलेस्ट्रॉल पातळी कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे वजन कमी करणं सोपं होतं.


## डासोत्पत्ती आहे तोपर्यंत हिवतापाचे उच्चाटन अशक्यच

गेल्या काही दशकात हिवतापावर मात करण्यासाठी जागतिक पातळीवर सर्वच स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. हिवताप अर्थात मलेरियाच्या रुग्णसंख्येत घट होते; मात्र समूळ उच्चाटन होत नाही. जोपर्यंत डासोत्पत्ती आहे, तोवर मलेरियाचे उच्चाटन अशक्य आहे. दरवर्षी आरोग्य विभागात जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल रोजी साजरा केला जातो. जनजागृती केली जाते. तरीही दरवर्षी मलेरियाचे तब्बल १० हजार रुग्ण पूर्व विदर्भात आढळतात.प्लाझमोडीअम या परोपजीवी जंतूंमुळे होणाऱ्या हिवतापावर मात करायची असेल तर सरकारी आरोग्य यंत्रणेच्या प्रयत्नांबरोबर जनतेचा सहभाग, स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. सर्वांनी एकाच वेळी एक दिलाने प्रयत्न केले तर हिवतापाच्या लढाईत हिवतापाचा पराभव करू शकतो. हिवतापाचे रुग्ण आढळत असले तरी, उद्रेक होऊ नये म्हणून वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना आरोग्य विभाग करीत आहे. यामुळेच हिवतापावर नियंत्रण असून, दरवर्षी घट दिसून येते.हिवतापाची लक्षणे थंडी वाजून ताप येणे ताप सततचा असू शकतो तापानंतर घाम येतो अंग गार पडणे डोके दुखणे बऱ्याच वेळा उलट्या होतात आरोग्य विभाग राबवते प्रतिबंधात्मक उपाययोजना रुग्ण शोधणे रुग्णावर उपचार करणे डास नियंत्रण औषधोपचार डासांची उत्पत्तीस्थाने व्हावी नष्ट साचलेल्या पाण्यात मलेरियाचे डास होतात. अर्थात भात शेती, पाण्याची डबकी, नाले, नदी, पाण्याच्या टाक्यात मलेरियाच्या डासांची उत्पत्ती होते. ‘नापिलस’ डासांची मादी हिवतापाचा संसर्ग पसरविते. मादी चावल्यावर रक्तासोबत हिवतापाचे जंतू पोटात जातात. शरीरात ते जंतू यकृतमध्ये जातात, त्यांची वाढ होऊन दहा दिवसात थंडी वाजून ताप येतो. नागपूर मुक्त होतोय का?नागपूर जिल्ह्यात मागील तीन वर्षांपासून हिवतापबाधितांची (मलेरिया) संख्या कमी होत आहे. यावर्षी जिल्ह्यातील ग्रामीण भागात केवळ एक बाधित आढळला. त्यामुळे नागपूर जिल्हा हिवताप निर्मूलनाच्या दिशेने प्रवास करत आहे, अशी चर्चा आरोग्य विभागात रंगली आहे. जिल्ह्यात २०२१ मध्ये हिवतापाचे ७ रुग्ण आढळले होते. तर २०२२ मध्ये रुग्णसंख्या १२ होती. २०२३ मध्ये ५ रुग्ण आढलले. १ जानेवारी ते एप्रिलदरम्यान केवळ एक रुग्ण आढळला.नागपूर आरोग्य विभागाने पूर्व विदर्भात वेळोवेळी कीटकनाशक फवारणीसह इतर उपाय केले. यंदा वेळी अवेळी पाऊस येतो; मात्र गतवर्षीच्या तुलनेत हिवतापाची रुग्णसंख्या कमी आहे. ती आणखी खाली आणण्याचे प्रयत्न आहे. दशकापूर्वीच्या तुलनेत पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त मलेरियाबाधितांची संख्या कमी झाली. सर्वाधिक रुग्ण गडचिरोलीत आढळतात. नागपूर जिल्ह्यात एक रुग्ण आढळला.

## कॉँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांची उदया उदगीर येथे सभा

लातुर प्रतिनिधी : दि. २५ एप्रिल २०२४ लातूर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी कॉँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉं.काळगे शिवाजी बंडाप्पा यांच्या प्रचारार्थ अखिल भारतीय कॉँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस नेत्या प्रियंकाजी गांधी यांची शनीवार दि. २७ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता उदगीर येथे सभा आयोजीत करण्यात आली आहे. भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाच्या सरचिटणीस प्रियांकाजी गांधी यांच्या सभांना देशभरात उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. या अनुषंगाने लातूर लोकसभा मतदार संघाचे महाविकास आघाडी कॉँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉं. काळगे शिवाजी बंडाप्पा यांच्या प्रचारार्थ लातूर लोकसभा मतदार संघातील महत्वाचे शहर असलेल्या उदगीर येथे त्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेची जय्यत तयारी सुरू असून संपूर्ण मतदार संघातून मोठया प्रमाणात लोक या सभेला लोक उपस्थित राहतील राहणार आहेत. लातूर लोकसभा मतदारसंघातील युवक, शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उदयोजक,युवक यासह सर्व समाज घटक तसेच सर्वसमान्य नागरीकांनी या सभेला उपस्थित रहावे असे आवाहन, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, नेते यांनी केले आहे.

## दिल जीत लिया! भारतीय व्यक्तीने दिले पाकिस्तानी तरूणीला जीवनदान, मोफत झाली शस्त्रक्रिया, काय घडलं नेमकं?



पाकिस्तानातील १९ वर्षीय आयशा रशन नावाची मुलगी पाच वर्षांपासून हृदयविकाराने त्रस्त होती. तिचे हृदय ट्रांसप्लांट करण्यासाठी डॉक्टर हृदयदाता शोधत होते. हा शोध ३१ जानेवारीला पूर्ण झाला. तिचे हृदय ट्रांसप्लांट करण्यात आले आणि आता ती निरोगी आहे. या हृदय ट्रांसप्लांटची खास गोष्ट म्हणजे हे भारतात झाले आहे.एवढेच नाही तर आयशाला समर्पित केलेले हृदयही भारतीयाचे आहे. आयशाला पाकिस्तानातून चेन्नई, तामिळनाडू येथे आणण्यात आले. येथे एमजीएम हेल्थकेअरच्या डॉक्टरांनी दिल्लीतील रुग्णालयातून आणलेल्या ६९ वर्षीय ब्रेन-डेड रुग्णाचे हृदय ट्रांसप्लांट केले. एवढेच नाही तर पाकिस्तानी तरूणीची ही शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली.२०१९ मध्ये हृदयविकाराचे निदान झाले आयशा हृदयविकाराने त्रस्त असल्यामुळे २०१९ मध्ये पहिल्यांदा भारतात आली होती. त्यावेळी अड्यार येथील मलार रुग्णालयातील वरिष्ठ हृदय शल्यचिकित्सक डॉ.के.आर. बालकृष्णन यांनी हृदय ट्रांसप्लांट करण्याचा सल्ला दिला होता. तिला राज्य अवयव नोंदणीमध्ये प्रतीक्षा यादीत ठेवण्यात आले होते.गेल्या वर्षी तब्येत बिघडली २०२३ मध्ये आयशाच्या हृदयाची उजवी बाजू खराब होऊ लागली. तिच्या हृदयाने काम करणे बंद केल्यानंतर तिला संसर्गही झाला. आयशाची आई सनोबर राशन म्हणाली, ’तिच्या मुलीला असा त्रास होताना पाहून खूप वाईट वाटत आहे. आम्ही सर्जनशी संपर्क साधला. आम्ही त्यांना सांगितले की आम्हाला शस्त्रक्रिया परवडत नाही, परंतु त्यांनी आम्हाला भारतात येण्यास सांगितले.३१ जानेवारीला डोनर मिळाला सप्टेंबर २०२३ मध्ये, डॉ. बालकृष्णन यांच्या टीमने त्यांना सांगितले की हृदय ट्रांसप्लांट हा एकमेव पर्याय आहे. अनेकवेळा हॉस्पिटलला भेट दिल्यानंतर सनौबरला ३१ जानेवारीला हॉस्पिटलमधून फोन आला. हृदय आणि फुफ्फुस ट्रांसप्लांट आणि मेकॅनिकल सर्कुलेटरी सपोर्ट संस्थेचे सह-संचालक डॉ. केजी सुरेश राव म्हणाले की, संपूर्ण देशात कोणतेही संभाव्य प्राप्तकर्ते नसतानाच परदेशी लोकांना हृदयाचे वाटप केले जाते. या रुग्णाचे हृदय ६९ वर्षांच्या व्यक्तीचे असल्याने अनेक सर्जनला संकोच वाटत होता.ट्रांसप्लांट एकच पर्याय डॉ केजी सुरेश म्हणाले की, दात्याच्या हृदयाची स्थिती चांगली असल्यामुळे आणि काही प्रमाणात आयशासाठी ही एकमेव संधी असल्यामुळे आम्ही धोका पत्करण्याचा निर्णय घेतला. शस्त्रक्रिया व्यवस्थित पार पडली आणि काही दिवसांनी आयशाला लाइफ सपोर्ट काढून घेण्यात आला १७ एप्रिल रोजी रुग्णालयातून मिळाला डिस्चार्ज स्वयंसेवी संस्था ऐश्वर्या ट्रस्ट, माजी रुग्ण आणि डॉक्टर यांच्याकडून निधी गोळा करण्यात आला. १७ एप्रिल रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज मिळण्यापूर्वी आयशाच्या कुटुंबीयांनी रुग्णालयाचे बिल भरले. हृदय प्रत्यारोपणासाठी सुमारे ३५ लाख रुपये खर्च झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## श्री त्रिपुरा महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत उत्तुंग यश

लातूर : एनटीए द्वारे घेण्यात आलेल्या जेईई मेन्स २०२४ परीक्षेत रिलायन्स लातूर पॅटर्न-श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी घवघवीत यश मिळवून सर्वो त्कृष्ट यशाची परंपरा राखली आहे. एनटीए द्वारे जेईई मेन्स ही परिक्षा अभियांत्रिकी प्रवेशासाठी राष्ट्रीय स्तरावर घेतली जाते. जेईई मेन्स परीक्षा दोन सत्रामध्ये घेतली जाते. या परीक्षेचे पहिले सत्र २४ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान पार पडले. त्याचे दुसरे सत्र ४ एप्रिल ते ९ एप्रिल २०२४ या दरम्यान संपन्न झाले. पहिल्या सत्रात संपूर्ण भारतातून ११.७ लाख विद्यार्थ्यांनी हि परीक्षा दिली होती. तर द्वितीय सत्रात १० लाख ६७ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

संस्थेतून चि. अभिनव ठाकूर या विद्यार्थ्याने (९९.६८ %ळश्रश) गुण घेऊन प्रथम येण्याचा बहुमान मिळवला तर प्रणव खिंडे याने (९९.४१%ळश्रश) सह महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक मिळविला. पारस शिवहरे (९९.१५%ळश्रश) सह तृतीय क्रमांक मिळवला. तसेच कु. दिशा पुरोहित (९९.०८४%ळश्रश), कु. दिव्या लोखंडे (९९.०६८%ळश्रश) इ. विद्यार्थी (९९%ळश्रश) पेक्षा अधिक गुण संपादन केले.या विद्यार्थ्यांसह कु. शगुन गुहारीकर (९८.९१%ळश्रश), कु. माधवी चिपाडे (९८.४७%ळश्रश),चि. हर्ष बंसीवाल (९८.३०%ळश्रश), चि.अनय भगत (९७.९०%ळश्रश), राजनंदिनी तोडकरी (९७.३८ %ळश्रश), दिव्यांष दीक्षित (९७.११%ळश्रश), चि. समीर शेख (९६.५९%ळश्रश), कु. ऋतुजा क्षीरसागर (९६.२०%ळश्रश), कु. अनुष्का पांडे (९६.१६%ळश्रश), चि. श्रेयस गुडगे (९६.१४ %ळश्रश), चि. नागेश पांचाळ (९५.४०%ळश्रश) इ. विद्यार्थ्यांनी असाधारण यश संपादन केले. संस्थेच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या एकत्रित सातत्यपूर्ण प्रयत्नामुळे हे यश साध्य झाले. रिलायन्स लातूर पॅटर्न च्या प्राध्यापकांनी अधिकाधिक नाविन्यपूर्ण उपक्रमातून याहूनही दैदीप्यमान निकाल संपादन करावा असे संस्थेचे अध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव सर यांनी मनोगत व्यक्त केले. यशाबद्दल संस्थाध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव सर, सचिव तथा महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. सुलक्षणा केवळराम, कोषाध्यक्षा मा. प्रेरणा होनराव, कार्यकारी संचालक प्रा. ओंकार होनराव, उपप्राचार्य मा. राजकुमार केदासे, प्रा. यादव सर, प्रा. वर्मा सर, प्रा. सोनी सर, प्रा. अमित सर, प्रा. गौतम सर, प्रा कलाल सर, प्रा. पाटील सर, प्रा. कुलकर्णी सर यांनी विद्यार्थ्यांचे या दैदीप्यमान यश प्राप्तीसाठी कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रिंकु बनसोडेच्या मारेकऱ्यास कठोर शिक्षा द्या :विज कर्मच्याऱ्याची मागणी



लातूरः लातूर येथील मुळ रहिवाशी असलेल्या रिंकू बनसोडे या बारामती विभागात मोरगाव शाखा अंतर्गत वरिष्ठ तंत्रज्ञ या पदावर महावितरण मध्ये कार्यरत होत्या दिनांक २४ एप्रिल रोजी त्या आपल्या शाखा कर्यालयात शासकीय दैनंदिन कामकाज करत होत्या त्या वेळी आरोपी अभिजीत पोटे यांनी माझे वीज बिल जास्त का आले आहे.ते कमी करुन द्या असे म्हणत कर्तव्यावर असलेल्या तांत्रिक महीला कर्मचारी रिंकू बनसोडे यांच्यावर हल्ला करून कोयत्याने सोळा वार केले या हल्यात यांच्या मृत्यू झाला या घटने मुळे महाराष्ट्रातील वीज कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरलेला आहे महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांला काळींबा फासणार्या या दुर्दैवी घटनेमुळे वीज कर्मचाऱ्यामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे संबंध महाराष्ट्रात या संघटनेचा निषेध म्हणून वीज कर्मचाऱ्यांनी विविध ठिकाणी शोकसभा घेत या घटनेचा निषेध केला आहे.याचाच एक भाग म्हणून लातूर महावितरणच्या परिमंडळ कार्यालया समोर वीज कर्मचारी एकत्र येत महिला विज कर्मचारी रिंकू बनसोडे यांना श्रद्धांजली अर्पण करत आरोपीला कठोर शिक्षा व्हावी हे प्रकरण जलद गती न्यायालयात चालवावे तांत्रिक वीज कर्मचारी यांना विज बिल वसुलिच्या वेळेस पोलीस संरक्षक द्यावे,या व अशा आशयाच्या मागण्या वीज कर्मचाऱ्यांनी यावेळी केल्या.या शोक सभेला लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे,कार्यकारी अभियंता गणेश सामसे,अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती जोती कुमठेकर,कामगार अधिकारी महेंद्र चुनारकर,कामगार प्रतिनिधी अनिल पुरी,दीपक कटके,सुदर्शन बोळेगावे, राहुल भंडारे,नारायण गडगडे ,ओम मुदगडे,राम वाडकर,सुधाकर साठे सतीश गिरी,सचिन गुरव,बालाजी कांबळे,रवी पांचाळ,रवी घोडके, अनिल ढेकळे यांच्यासह वीज कर्मचाऱ्यांची या शोकसभेला मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १० तरण तलावांमध्ये मिळणार पोहण्याचे प्रशिक्षण

मुंबई /शहामत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १० जलतरण तलावांवर उन्हाळी सुट्टी दरम्यान पोहण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी २१ दिवसांचे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहे. दिनांक २ मे २०२४ पासून २१ दिवसांचे प्रशिक्षण सुरू करण्यात येणार आहे. तर याच प्रशिक्षणाच्या दुस–या कालावधीचा प्रारंभ दिनांक २३ मे २०२४ पासून होणार आहे. प्रशिक्षणासाठीची नाव नोंदणी पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. त्यासाठीची लिंक बुधवार, दिनांक २४ एप्रिल २०२४ सकाळी ११ वाजेपासून कार्यान्वित होणार आहे. 'जलतरण' अर्थात 'पोहणे' हा जसा एक क्रीडा प्रकार आहे, त्याचप्रमाणे तो एक चांगला व्यायाम प्रकारही आहे. मुंबईकर नागरिकांना या क्रीडा व व्यायाम प्रकाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेचे १० तरण तलाव कार्यरत आहेत. मात्र, अनेकदा पोहण्याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण न मिळाल्याने अनेक इच्छुक या क्रीडा प्रकारापासून लांब राहतात. पोहणे शिकण्याची इच्छा असणाऱ्या मुंबईकरांना बृहन्मुंबई महानगरपालिकेने यंदाच्या उन्हाळ्यात अशी संधी उपलब्ध करून दिली आहे



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १० जलतरण तलावांमध्ये दिनांक २ मे २०२४ पासून २१ दिवसांचे प्रशिक्षण सुरू करण्यात येत आहे. तर याच प्रशिक्षणाच्या दुस–या कालावधीचा प्रारंभ दिनांक २३ मे २०२४ पासून होणार आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात येत असलेल्या या प्रशिक्षणासाठीची नाव नोंदणी पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यासाठीची लिंक बुधवार, दिनांक २४ एप्रिल २०२४ पासून कार्यान्वित होणार असल्याची माहिती उप आयुक्त (उद्याने) किशोर गांधी यांनी दिली आहे. या जलतरण प्रशिक्षणासाठी माफक शुल्क आकारणी केली जाणार आहे. पंधरा वर्षांपर्यंतची मुले, ६० वर्षांपुढील नागरिक, दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी २ हजार १०० रूपये, तर १६ ते ६० वयोगटातील नागरिकांसाठी ३ हजार १५० रूपये शुल्क आकारले जाणार आहे. १० जलतरण तलावांमध्ये दिनांक २ मे २०२४ ते दिनांक २२ मे २०२३ आणि दिनांक २३ मे २०२४ ते दिनांक १२ जून २०२४ या कालावधी दरम्यान जलतरण प्रशिक्षण दिले जाणार आहे. जलतरण प्रशिक्षण हे दररोज दुपारी १२.३० ते १.३०, दुपारी २ ते ३ आणि ३.३० ते ४.३० अशा तीन तुकड्यांमध्ये २१ दिवस आयोजित केले जाणार आहे. सदर विशेष उन्हाळी सत्राची सभासद नोंदणी फक्त ऑनलाईन पध्द्तीनेच दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून सुरू होणार आहे. तर, दिनांक २३ मे २०२४ ते दिनांक १२ जून २०२४ या कालावधीतील प्रशिक्षण वर्गाची सभासद नोंदणी दिनांक ६ मे २०२४ पासून सुरू करण्यात येईल. सभासदत्वासाठी या लिंकचा उपयोग करावा. सभासद नोंदणीच्या चौकशीसाठी १८००१२३३०६० या टोल फ्रि क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

या तरण तलावात दिले जाणार प्रशिक्षण...
१. महात्मा गांधी स्मारक ऑलिंपिक जलतरण तलाव, दादर (पश्चिम)
२. जनरल अरूणकुमार वैद्य ऑलिंपिक जलतरण तलाव, चेंबूर (पूर्व)
३. सरदार वल्लभभाई पटेल ऑलिंपिक जलतरण तलाव, कांदिवली (पश्चिम) ४. बृहन्मुंबई महानगरपालिका दहिसर (पश्चिम) जलतरण तलाव, कांदरपाडा,दहिसर (पश्चिम). ५. बृहन्मुंबई महानगरपालिका मालाड (पश्चिम) जलतरण तलाव, चाचा नेहरु मैदान, मालाड (पश्चिम). ६. बृहन्मुंबई महानगरपालिका अंधेरी (पश्चिम) जलतरण तलाव, गिल्बर्ट हिल, अंधेरी (पश्चिम). ७. बृहन्मुंबई महानगरपालिका अंधेरी (पूर्व) जलतरण तलाव, कोंडिविटा गाव, अंधेरी (पूर्व). ८. बृहन्मुंबई महानगरपालिका वरळी जलतरण तलाव, वरळी जलाशय टेकडी, वरळी. ९. बृहन्मुंबई महानगरपालिका विक्रोळी जलतरण तलाव, टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) १०. बृहन्मुंबई महानगरपालिका वडाळा जलतरण तलाव, वडाळा अग्निशमन केंद्र, वडाळा.

## पिकअप, मोटारसायकल गेली पुलात, नऊ जण जखमी
## गुत्तेदाराचा बेजबाबदारपणा : थाराजवळ ३ तास रास्ता रोको

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) राष्ट्रीय महामार्गावर पुलाच्या कामाजवळ डायव्हर्शन फलक न लावल्याने पुलाचा अंदाज न आल्याने नवस फेडण्यासाठी एक कुटुंब घेऊन जाणारी पिकअप पुलात जाऊन पलटी झाली. या अपघातात नऊ जण जखमी झाले. हा अपघात २३ एप्रिलच्या रात्री अकराच्या सुमारास बोधडी ते थारादरम्यान झाला. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. दरम्यान, संतप्त नातेवाइकांनी पुलाजवळ २४ एप्रिल रोजी तीन तास रास्ता रोको आंदोलन केले. पिकअपमध्ये तीन बकरे व लहान–मोठी २० माणसे होती. त्यात दोन महिन्यांच्या बाळाचाही समावेश होता. दैवबलवत्तर म्हणून कोणतीही हानी झाली नाही. सर्व जखमींवर गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. संबंधित गुत्तेदारावर कारवाई करावी, यासाठी संतप्त नातेवाइकांनी पुलाजवळ २४ एप्रिल रोजी तीन तास रास्ता रोको केला. निवडणूक प्रक्रियेसाठी कर्मचारी घेऊन नांदेडकडे जाणाऱ्या दहा बसेस रास्ता रोकोत अडकल्या होत्या. तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी आंदोलनस्थळी भेट दिल्यानंतर तीन तासांनी वाहतूक सुरळीत झाली. साडेसहा वर्षांपासून नांदेड – भोकर – हिमायतनगर किनवट माहूर धनोडा या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ ए चे काम अजूनही पूर्ण झाले नाही. या महामार्गावर काही ठिकाणी पुलाचे काम





सुरू आहे. सुरुवातीपासूनच या महामार्गावर जेथे जेथे काम सुरू होते, तिथे तिथे काम सुरू असल्याचे वा वळण मार्ग दर्शवणारे फलक लावण्यात आले नव्हते. २३ एप्रिल रोजी रात्री हिमायतनगर येथील एक कुटुंब आपला नवस फेडण्यासाठी एपी १ एक्स ४५६८ क्रमांकाच्या पिकअपने चंद्रपूरकडे जात होते. समोर एक मोटारसायकल होती. पुलाच्या बांधकाम ठिकाणी डायव्हर्शन फलक लावलेला नसल्याने पुलाचा अंदाज मोटरसायकलवरून जाणाऱ्यांना आला नाही. तसेच मोटारसायकलच्या मागे असलेल्या पिकअप चालकालाही अंदाज आला नाही. एकामागे एक असलेली दोन्ही वाहने पुलात जाऊन पडली. मोटारसायकल खाली अन पिकअप त्यावर अशी परिस्थिती होती. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी पिकअपमधील लक्ष्मण बेले (वय ६०), दरेकाबाई बेले (५०), राजू देवकर (४०), रेणुका बेले (४५), धोंडिबा गायकवाड (४०) प्रेमसिंग आडे (५२, सर्व रा. हिमायतनगर), मोटारसायकलवरील अभिषेक सलाम (२२), स्वप्नील आत्राम (१९, रा. अंबाडी) हे जखमी झाले. तर दोन्ही वाहनांचा चक्काचूर झाला आहे. सर्व जखमींना गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात डॉ. जुबेरी यांनी उपचार केले. सर्वांची प्रकृती ठणठणीत असल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. डी. जी केंटे यांनी सांगितले कंत्राटदारावर कारवाईची मागणी : राष्ट्रीय महामार्गाच गुत्तेदार बेजबाबदारीने काम करत आहेत. त्यांच्यावर कारवाई करावी व आम्हाला मदत मिळावी, यासाठी त्याच ठिकाणी २४ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजतापासून सर्व वाहने रोखून रास्ता रोको केला तेथे वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. :पोलिस निरीक्षक सुनील बिर्ला व त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. पण, नातेवाइक काही ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. अखेर किनवटच्या तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी सर्वांची समजूत काढली. त्यानंतर वाहतूक पूर्ववत झाली.

## ग्रामविकास आधिकारी प्रेमसिंग आडे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) :तालुक्यातील चिखली ग्रामपंचायत हद्दीतील नमुना नंबर ८ लावण्यासाठी ५ हजाराची लाच घेणाऱ्या ग्रामसेवकाला लाचलुचपत प्रतिबंध पथकाने पकडले. या प्रकरणी ग्रामसेवकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. चिखली ग्रामपंचायत हद्दीतील शेत सर्वे नं. ११८/२ मधील मोकळी जागा असलेला प्लॉट तक्रारदार यांनी खरेदी केला होता. तो प्लॉट नमुना नंबर ८ ला लावण्यासाठी मांडवीचे ग्रामसेवक प्रेमसिंग मोतिराम आडे (वय ५२) यांच्याकडेच गेले असता ५ हजार रुपयाची मागणी केली. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली असता दि. २३ एप्रिल रोजी ग्रामसेवकास राहाते घरी गोकुंदा येथे लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने सापळा रचून पकडले. पोलीस अधीक्षक डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस उपअधीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनात पो. नि. अरविंद हिंगोले पो. अं. सूर्यकांत वडजे, राजेश राठोड, विनयकुमार नुकलवार, सय्यद खदीर सय्यद हकीम पाशा, मोतीराम सोनटक्के यांनी ही कार्यवाही पूर्ण केली.



## सरकारने सर्वसामान्य माणसाच हित सांभाळले पाहिजे या भुमिकेतून लोकहीताचे काम करणारा उमेदवार डॉ. काळगे शिवाजी बंडाप्पा यांना मतदान करावे

लातुर / प्रतिनिधी :– सरकारने सर्वसामान्य माणसाच हित सांभाळले पाहिजे, आपल्या कामातून जनता सुखी समाधानी झाली पाहिजे. या भुमीकेतून लोकनेते विलासराव देशमुख यांनी काम केली आहे, त्यांचा वारसा सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण तथा कार्यमंत्री अमित विलासराव देशमुख, आमदार धीरज विलासराव देशमुख समर्थपणे चालवत आहेत. या भुमिकेतून लोकांच्या हीताचे काम करणारा उमेदवार निवडूण देण्यासाठी लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. काळगे शिवाजी बंडाप्पा यांना मतदान करावे असे आवाहन, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी केले. लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. काळगे शिवाजी बंडाप्पा यांच्या प्रचारार्थ जवळा (बु), कासारजवळा येथील महीला संवाद बैठक आयोजीत केली होती, यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीस कृषी उत्पन्न बाजार सभापती जगदीश बावणे, सौ. सुनीताताई आरळीकर, महिला काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष दैवशाला राजमाने आदी उपस्थित होते. यावेळी बोलतांना वैशाली देशमुख म्हणाल्या की, शेतकरी, कष्टकरी यांच्यासाठी मांजरा परीवार व जिल्हा मध्यवर्ती बँक शेतकऱ्यांच्या हिताचे काम करीत आहे. सदया लोकसभा निवडणूक सुरू आहे. या लोकसभा निवडणूकीत डॉ. काळगे हे उच्चशिक्षीत व सर्वसामान्यांशी नाळ जोडलेले, त्यांच्या प्रश्नांची जाण असणांरे उमेदवार आहेत, त्यांना मतदान करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या भारतीय जनता पक्षाच्या गेल्या दहा वर्षातील कामाकाजाला आणि एकाधीकारशाहीला जनता कंटाळली आहे. गेल्या दहा वर्षाच्या सरकारच्या कामातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसामान्यांच्या हिताची व हक्कासाठी निर्माण केलेले संविधान सध्या धोक्यात आहे असे पाहयला मिळत आहे. संवीधान टिकवण्यासाठी लातूर लोकसभा उमेदवार डॉ. शिवाजीराव काळगे यांना मतदान करावे, असे आवाहन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांनी केले. याप्रसंगी विलास सहकारी साखर कारखान्याचे संचालक गोविंद बोराडे, विकासरत्न विलासराव देशमुख सहकारी साखर कारखान्याचे संचालक कैलास पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य किसनराव लोमटे, संचालक भैरवनाथ सवासे, दत्ता शिंदे, उपसरपंच मनोज कापरे, कासारजवळाचे सरपंच महेश हावळ, सौ. संगीताताई ब्याळे, विजयकुमार चोंडे, राम राजमाने, संतोष लोमटे, पप्पू चौंडे, सिंधू सव्वाशे, जयश्री चोंडे, विमल भुजबळ, अनुसया बंडगर, आदीसह जवळा, कासार जवळा येथील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार दत्ता बनाळे यांनी केले तर आभार भैरवनाथ सवासे यांनी मानले.



## संभाव्य उष्णतेच्या लाटेच्या अनुषंगाने जनजागृतीवर भर देण्याच्या सूचना

लातूर, दि. २५ : हवामान अंदाजानुसार पुढील काही दिवसातील संभाव्य उष्णतेची लाट लक्षात घेवून उपाययोजना हाती घेण्यात याव्यात. या काळात काय करावे आणि काय करू नये, याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी दिल्या. तसेच नागरिकांनीही उष्माघातापासून बचावासाठी खबरदारी घेवून प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.संभाव्य उष्णतेच्या लाटेबाबत प्रत्येक विभागाने कोणत्या दक्षता घ्यायच्या याबाबत जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केली होती. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबसाहेब मनोहरे, निवासी उप जिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. व्ही.एच. वडगावे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन सहायक अर्चना बिसोई यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वडगावे यांनी आरोग्य यंत्रणेच्या तयारीबाबत माहितीचे सादरीकरण केले.जिल्ह्यातील आरोग्य केंद्रांमध्ये, वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उष्माघात विरोधी औषधे याच्यासह आवश्यक सज्जता ठेवावी. यासोबतच उष्णतेच्या लाटेमध्ये नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी, घरगुती उपाययोजना आदी बाबींची माहिती द्यावी. यासाठी आरोग्य विभागात कार्यरत आयुर्वेदिक डॉक्टरांची मदत घ्यावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले.आरोग्य विभागाने उष्माघाताच्या अनुषंगाने उपचाराबाबत आवश्यक तयारी करावी. खबरदारीच्या उपायांबाबत जनजागृतीवर भर द्यावा. जास्त गर्दी होणाऱ्या ठिकाणी आवश्यक उपाय योजना करण्याच्या संबंधितांना सूचना द्याव्यात, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. उष्णतेची लाट म्हणजे काय? तापमानाच्या निकषानुसार सलग दोन दिवस डोंगरी भागात ३० डिग्री सेल्सियस आणि समतल भागात ४० डिग्री सेल्सियस पेक्षा जास्त तापमानाची नोंद होणे किंवा या भागात सलग दोन दिवस हंगामातीला सामान्य तापमानापेक्षा ४.५ डिग्री सेल्सियस पेक्षा जास्त तापमानाची वाढ होणे. यापैकी कोणतीही एक नोंद आढळल्यास या भागात उष्णतेची लाट आहे हे समजून होणारे परिणाम टाळण्यासाठी दक्ष राहणे गरजेचे आहे.

## टवेन्टिवन ग्रीच्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख यांनी प्रभाग २ मधील महीलांशी साधला सुसंवाद डॉ. काळगे शिवाजी बंडाप्पा यांना मतदान करण्याचे केले आवाहन

लातुर प्रतिनिधी : दि. २५ एप्रिल २०२४ ४१ – लातूर (अ.जा.) लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. काळगे शिवाजी बंडाप्पा यांना भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन टवेन्टिवन शुगर्सच्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख यांनी प्रभाग २ मधील महीलांशी आयोजीत सुसंवाद बैठकीत केले. लातूर लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस





महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. काळगे शिवाजी बंडाप्पा यांच्या प्रचारार्थ प्रभाग २ मधील महीलांची बैठक लिज्ञत पापडच्या संचालीका शिला वाघमारे यांच्या निवासस्थानी आयोजित केली होती, या प्रसंगी त्या बोलत होत्या. या बैठकीस माजी महापौर सौ. स्मिता खानापुरे, संगीता मोळवणे, सपना किसवे आदी उपस्थित होते. बैठकीस प्रभाग २ मधील महीला मोठया संख्येने उपस्थित होत्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE